महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे     Rs.2/-     कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 13 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 256 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



## संपादकीय

### ठाणे जिल्ह्यात पन्नास हजाराहून अधिक झाडांची कत्तल!


### वन विभाग करते काय?

— रवींद्र घोडविंदे —

पर्यावरणाचा सतत बदलता असमतोल; त्यातून बदलते हवामान याचा फटका संपूर्ण सजीव सृष्टीला बसत आहे. वाढता उन्हाळा कधी अवेळी कोसळणारा धुवाधार पाऊस तर कधी अवेळी येणारे चक्री वादळ यामुळे बदलते पर्यावरण सजीव सृष्टी समोरील आव्हानात्मक ठरते आहे. या पर्यावरणाच्या समतोलातील महत्वाची भूमिका बजावणाऱ्या वृक्ष संपत्ती कडे खुद्द वन विभागच डोळे झाक करू लागले आहे. किडलेली, भ्रष्ट कारभाराने वेढलेली ही यंत्रणा फक्त कागदी घोडे राबविण्यात मस्त कारभार करत आहे. ठाणे जिल्ह्यातील वन विभागाच्या कारभाराच्या गैरव्हार अनेकदा चव्हाट्यावर आला आहे. हा विभाग नेमके काम करतो काय हाच एक्ष प्रश्न बनला आहे. या जिल्ह्यातील गत दहा महिन्यात पन्नास हजाराहून अधिक झाडाची कत्तल झाली आहे. ही वृक्ष तोड करणारी टोळी आपले काम करते तिला आशीर्वाद याच विभागातील बाबू चा आहे. खाजगी जमिनीवरील झाडे तोडण्यासाठी ठेकेदार एक सात बाऱ्या उतर्यावरील झाडे तोडण्याची परवानगी घेतो आणि त्याच परवानगीच्या नावाने कमीत कमी आठ ते दहा सात बाऱ्या उताऱ्यातील झाडे तोडून आपला स्वार्थ साधतात यात वन अधिकारी मजबूत कमावतात नष्ट होतात ती बिचारी झाडे. कल्याण, मुरबाड, शहापूर सह भिवंडी अंबरनाथ तालुक्यातील खाजगी व वनविभागाच्या झाडाची बेसुमार तोड ती ही बिना परवानगी सुरु आहे. पन्नास हजाराहून अधिक झाडे प्रतीवर्षी तोड काम म्हणजे काय भयाण आणि भीषणता.... परंतु डोळ्यावर पट्टी आहे, की डोळस असून आधळ बनालेली वन विभाग यात्रणा करते काय? या प्रश्नाचे उत्तर देणार कोण? सरकारी प्रोजेक्त, महामार्ग, टॉवर लाईन हे निमित्त आपलं ठरलंय ते साध्य करण्यासाठी वन विभाग अधिकारी फक्त दिखाऊ काम करतात. म्हणूनच ठाणे जिल्ह्यातील हिरवे डोंगर भकास झालेत, घनदाट जंगल माळरान बनते आहे. ठाणे जिल्ह्यातील लाडके वन मंत्री गणेश नाईकांनी आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कामाचे क्षेत्र आणि तेथील वास्तव स्थिती जाणून घ्यावी अन्यथा येथील वन जमीन निम्मी शिल्लक आहे, तिथे वृक्षाच्या संरक्षण संवर्धनाचे काय? हे ही तपासावे हीच इच्छा!!!

# आधी पुनर्वसन; मगच काळू धरण !

## काळू धरणग्रस्तांचे बारवी धरणाच्या धर्तीवर पुनर्वसन करा ! आ. किसन कथोरेंची मागणी



**सध्या सुरू असलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या प्रश्नावर उत्तर देताना काळू धरण लवकर उभारत पाणीटंचाईवर तोडगा काढला जाईल, असे उत्तरात सांगितले. त्यावेळी मंगळवारी मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी काळू धरण प्रकल्पातील पुनर्वसन आणि भूसंपादनाबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेतली. यावेळी कथोरे यांनी “आधी पुनर्वसन मगच धरण” ही भूमिका स्पष्ट केली.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** ठाणे जिल्ह्याची भविष्यातील तहान भागवायची असेल तर काळू धरण तातडीने उभारण्याची गरज आहे. त्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री प्रयत्नशील आहेत. मात्र ‘आधी पुनर्वसन मगच धरण’ अशी भूमिका स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी घेतली आहे. बारवी धरणाच्या धर्तीवर पुनर्वसन करावे, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पुनर्वसन झाले नाही तर शेतकऱ्यांसह माझाही धरणाला विरोध असेल, अशीही भूमिका आमदार किसन कथोरे यांनी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत व्यक्त केली आहे.

ठाणे जिल्ह्याची वाढती लोकसंख्या आणि अपुरे पडणारे पाणी यावर तोडगा म्हणून काळू धरणाची उभारणी करण्यासाठी राज्य सरकार तयारीत आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या या काळू धरणावर घोषणा सोडल्यास ठोस काही झालेले नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून यासाठी पैसे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या धरणासाठी मुरबाड तालुक्यातील १२ ग्रामपंचायतीतील १८ गावे आणि २३ पाडे तसेच वन क्षेत्रातील सुमारे ९९९ हेक्टर जमिन पाण्याखाली जाणार आहे.

एमएमआरडीएने २००९ वर्षात याला मान्यता दिल्यानंतर २०११ वर्षात कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने या प्रकल्पाचे काम सुरू केले. मात्र स्थानिकांनी पुनर्वसन, पाण्याखाली जाणारी शेतजमीन आणि पर्यावरणाच्या नुकसानावर बोट ठेवत याला विरोध केला. सरकार हा प्रकल्प रेटून नेत असल्याचे कळताच स्थानिकांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करत या धरणाला विरोध केला होता. त्यानंतर १ मार्च २०१२ रोजी उच्च न्यायालयाने या प्रकल्पाला स्थगिती दिली होती. या स्थगितीनंतर अनेक बाबींची पूर्तता करण्याचे आदेशही सरकारला देण्यात आले होते. काही वर्षांपूर्वी या धरणाच्या कामाला पुन्हा हालचाल सुरू केल्यानंतर स्थानिकांनी पुन्हा विरोध केला होता. वेगवेगळ्या ग्रामसभांनी याविरूद्ध ठराव केले होते. तर गावामंध्ये अधिकाऱ्यांनी प्रवेश बंदीही करण्यात आली होती.

एमआयडीसीच्या बारवी धरणाच्या धर्तीवर पुनर्वसन करा, तरच स्थानिक शेतकरी प्रकल्पासाठी तयार होतील. पुनर्वसन शेतकऱ्यांच्या मनासारखे झाले नाही तर शेतकऱ्यांसह माझाही या धरणाला विरोध असेल, असे परखड मत यावेळी त्यांनी मांडले. यावर मंत्री महाजन यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून भूसंपादन अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे आता स्थानिक आमदारांच्या भूमिकेनंतर स्थानिक ग्रामस्थ काय भूमिका घेतात आणि बारवी धरणाप्रमाणे पुनर्वसन केल्यानंतर त्यांचा विरोध मावळतो का हे लवकरच कळेल.

# लोकसेवा आयोगातील अभियांत्रिकी पदांसाठी मराठीत परीक्षा

## मुख्यमंत्र्यांची ग्वाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

एमपीएससीच्या सर्वच परीक्षा मराठीत घेण्याचं नियोजन असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं आहे. एमपीएससीच्या अभियांत्रिकी परीक्षांचा सर्व अभ्यासक्रम मराठीत होणार असून सर्व तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीत घेणार असल्याचं नियोजन असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे . राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे . विधान परिषदेमध्ये सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा मराठी मध्ये घेण्याविषयी प्रश्न उपस्थित केला होता .या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते . इतर सदस्यांकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील पदभरती पारदर्शकता आणि पेपरफुटीचे प्रश्न विचारण्यात आले .

राज्यातील अभियांत्रिकी आणि कृषी विषयक तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीमध्ये घेतल्या जात नसल्याचे सांगत अभियांत्रिकी विषयांची पुस्तके मराठीमध्ये उपलब्ध नसल्याने या परीक्षा इंग्रजी भाषेत घेतल्या जातात .पण आता लोकसेवा आयोगातील अभियांत्रिकी पदांसाठी होणाऱ्या परीक्षा मराठीत होणार आहेत .अभियांत्रिकी पदांच्या अभ्यासक्रमांची पुस्तकेही मराठीत उपलब्ध होणार असून इतर सर्व तांत्रिक पदांच्या स्पर्धा परीक्षा ही मराठीमध्ये घेण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले .

दरम्यान राज्य शासनाच्या 42 विभागांमध्ये अडीच लाखांहून अधिक पदे ही रिक्त आहेत .दरवर्षी 50 हजार पदांची मेगा भरती करण्यासाठी जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात मात्र लोकसेवा आयोगाकडे मनुष्यबळ नसल्याने ही रिक्त पदे भरण्यासाठी वेळ लागतो .अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये अतिरिक्त 150 ते 200 पदे वाढवून देण्याची मागणी होत आहे .महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मनुष्यबळ नसल्याने खाजगी कंपनीकडून परीक्षांचे नियोजन केले जात असल्याचे सांगत यात अपारदर्शकता पेपर फुटी आणि कॉपी तसेच मार्गांमध्ये तफावत असल्याचे गैरप्रकार वारंवार निदर्शनास येत आहेत .याबाबत विचारणा केली असता पेपर फुटी कॉपी मार्कांमधील तफावत हे प्रकार आणि खाजगी कंपनीकडून परीक्षांचे नियोजन करणे यांचा संबंध नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात सांगितले .

## चिखलोली कचराभूमीला आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथ पूर्वेतील चिखलोली भागात असलेल्या अंबरनाथ नगरपालिकेच्या कचराभूमीला बुधवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीमुळे शेजारच्या सर्वोदय गृहसंकुलाच्या नागरिकांना धुराचा आणि दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागला. शेजारच्या डोंगरावर लागलेली आग पसरत कचराभूमी पर्यंत गेल्याचा अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे. सायंकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास ही आग आटोक्यात आली. मात्र कचराभूमी धुमसत असल्याची माहीती स्थानिक रहिवाशांनी दिली आहे.

## परिक्षा काळात बत्ती गुल, बारावीच्या परिक्षार्थींचे हाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर आणि अंबरनाथ शहरात सुरू असलेल्या रोहित्र क्षमतावाढ करण्याच्या कामामुळे भार व्यवस्थापनाच्या प्रयोगात बुधवारी पडघा केंद्रात झालेल्या बिघाडाची भर पडली. ऐन तीन वाजता वीजपुरवठा खंडीत झाल्याने त्याचवेळी सुरू असलेल्या बारावीच्या माहिती तंत्रज्ञान विषयाच्या ऑनलाईन परिक्षार्थी आणि शाळा व्यवस्थापनाचा जीव टांगणीला लागला होता. सुदैवाने पर्यायी विद्युत व्यवस्था पूर्ण वेळ सुरू राहिल्याने आणि इंटरनेट सुविधा सुरू असल्याने संकट टळले. मात्र महावितरणाला कल्पना देऊनही परिक्षा काळात खंडीत झालेल्या वीज पुरवठ्यामुळे शाळा व्यवस्थापन आणि पालकांनी संताप व्यक्त केला आहे. बदलापूर आणि अंबरनाथ शहरात गेल्या काही वर्षात वीज पुरवठ्याच्या समस्या वाढल्या आहेत. अनेकदा काही तांत्रिक बिघाड झाल्यास मोठा काळ अंधारात राहावे लागते. दोनच दिवसांपूर्वी अंबरनाथच्या आनंदनगर वाहिनीवरील रोहित्र क्षमता वाढवण्याच्या कामासाठी बंद घेण्यात आला. आठवडाभर अंबरनाथमध्ये चालणाऱ्या या कामाचा फटका बदलापूर पूर्वेतील नागरिकांना बसतो आहे.

# ठाण्यात कचराकोंडी

## सर्वपक्षीय बैठक घ्या !

### भाजपची पालिका आयुक्तांकडे मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे शहराच्या विविध भागात गेल्या तीन दिवसांपासून कचरा उचलला गेला नसून अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग लागले आहेत. या कचराकोंडीच्या प्रश्नासंदर्भात सर्वपक्षीय बैठक घेऊन त्यामध्ये तोडगा काढून ठाणेकरांना दिलासा द्यावा, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे.

ठाणे येथील वागळे इस्टेट भागातील सीपी तलाव परिसरातील कचरा हस्तांतरण केंद्रावर कचऱ्याचे ढीग साचले असून येथील दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच येथे दोनदा आग लागल्याने परिसरात सर्वत्र धूर पसरून नागरिकांना त्रास झाला. यामुळे स्थानिक नागरिकांसह शिवसेना (शिंदे गट) पक्षाने येथे कचरा आणण्यास विरोध केला.

या विरोधानंतर ठाणे महापालिकेने शहरातील कचरा भिवंडी येथील आतकोली भागातील कचराभुमीवर नेण्यास सुरूवात केली आहे. मात्र, ठाणे ते आतकोली अंतर ३७ किलोमीटर इतके असल्यामुळे शहरातील घंटागाड्यांचे वेळापत्रक कोलमडले असून शहरात घंटागाड्यांच्या फेऱ्या कमी झाल्यामुळे गृहसंकुलाच्या बाहेर तसेच अनेक ठिकाणी रस्त्यावर कचरा साठल्याचे चित्र दिसून येत आहे.

हा कचरा अतिरिक्त गाड्या लावून उचलण्यात येत असला तरी घंटागाड्यांचे वेळापत्रक कोलमडल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग अद्यापही दिसून येत आहेत. याच पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील कचराकोंडी प्रश्नासंदर्भात महापालिका आयुक्तांनी सर्वपक्षीय बैठक घ्यावी. तसेच त्यामध्ये तोडगा काढून ठाणेकरांना दिलासा द्यावा, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे.

गेल्या ४० वर्षांत कचराभुमी उभारण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरले. सध्या ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २५ लाखांहून अधिक झाली आहे. त्यामुळे भविष्यात कचरा निर्मूलनाचा प्रश्न आणखी भीषण स्वरुप धारण करेल. त्यामुळे आतापासून उपाय शोधण्यासाठी सुरुवात करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकाऱ्यांची सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी वाघुले यांनी केली आहे.

# भात खरेदी घोटाळ्यातील संचालक अटकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : शहापूर तालुक्यातील साकडबाव आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या संचालकांच्या मुसक्या आवळण्यात गुन्हे आर्थिक शाखेबरोबरच किन्हवली पोलिसांना यश आले आहे. सन २०२२-२०२३ वर्षाकरिता शेतकऱ्यांच्या हजारो क्विंटल भात खरेदीची जबाबदारी असलेल्या तालुक्यातील साकडबाव आदिवासी विविध कार्यकारी संस्थेचे संचालक जयराम सोगीर (रा. जांभूळवाड) यांनी शेकडो क्विंटलचा भात खरेदी घोटाळा करून रक्कम रुपये १ कोटी ६० लाखांची शासनाची फसवणूक केली आहे.

याबाबत उपप्रादेशिक व्यवस्थापक सागर सोनवणे यांनी फिर्यादी म्हणून गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी केवळ सहीचा मालक म्हणून संजय पांढरे तसेच आणखी एका जणांवर देखील आरोप ठेवण्यात आले होते. त्यामध्ये संजय पांढरे गेली वर्षभर जेलचे हवा खात असून या गुन्ह्यातील मुख्य आरोपी जयराम सोगीर याला परवा रात्री आठ वाजेच्या सुमारास जांभूळवाड येथील राहत्या घरून ताब्यात घेण्यात गुन्हे आर्थिक शाखेच्या मदतीने किन्हवली पोलिसांना यश आले आहे. शहापूर तालुक्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या भात खरेदीत अधिक चौकशी केली असता आणखीन मासे अडकण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी चौकशीची मागणी करत आहेत.




# होळी - रंगोत्सवात पर्यावरणस्नेहाचा जल्लोष करा

## भिवंडी महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी.जनसंपर्क विभागजाहिर आवाहनहोळी - रंगपंचमी सणाचा पर्यावरणस्नेही जल्लोष करा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन‘रंगोत्सव’ चा जल्लोष साजरा करताना निसर्गाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभुमीवर भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर, (भा.प्र.से.) यांनी शहरवाशीयांना यंदाची होळी आणि धुलीवंदन (रंगपंचमी) पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे करण्याचे आवाहन केले आहे. मा. उच्च न्यायालयामधील जनहित याचिका (क्र. १५५/२०११) अंतर्गत दिलेल्या निर्देशानुसार देशभरातील नागरिकांना पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने महापालिकेने विशेष मोहीम हाती घेतली असून, जलसंधारण, वृक्षसंवर्धन तसेच प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.पर्यावरणाचा समतोल राखण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची आहे. आपण परंपरा आणि संस्कृतीचे पालन करत असताना निसर्गाची हानी होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. त्यामुळे आपण सर्वजण पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर, (भा.प्र.से.) यांनी नागरिकांना उद्देशून केले आहे. नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे आणि प्रदुषणविरहित उत्सव साजरा करून एक जबाबदार नागरिक असल्याचा आदर्श निर्माण करावा, तसेच रायायनिक युक्त रंगाचा वापर टाळावा. त्याचबरोबर चालु वाहनांवर रंगाचे फुगे, प्लॅस्टिक पिशव्या फेकु नये त्यामुळे संभाव्य अपघात होणार नाही. तसेच पाण्याचा कमीत कमी वापर करावा. सर्वांनीच आपल्या पुढील पिढ्यांसाठी शुध्द हवा, स्वच्छ पाणी आणि हरित पर्यावरणाचा वारसा जपायला हवा. यासाठीच यंदाची होळी आणि रंगपंचमी ‘निसर्गस्नेही’ करण्याचा संकल्प करूया !पर्यावरण संवर्धन प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सण-उत्सवांचे महत्त्व कायम राखून, त्यांचा आनंद घेताना निसर्गाच्या संतुलनाची काळजी घेणे आवश्यक आहे. यंदाची होळी आणि रंगपंचमी पर्यावरणपूरक पध्दतीने साजरी करण्यासाठी महापालिका नागरिकांसोबत आहे. वृक्षतोड,



पाण्याचा अपव्यय आणि प्रदूषण टाळुन जबाबदारीने उत्सव साजरा करावा, असे आवाहन माननीय प्रशासक तथा आयुक्त यांनी केले आहे.

# गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ ४-३८ ॥

या जगात ज्ञानासारखे पवित्र करणारे खात्रीने दुसरे काहीही नाही. ते ज्ञान कितीतरी काळाने कर्मयोगाने अंतःकरण शुद्ध झालेला माणूस आपोआपच आपल्या आत्म्यात प्राप्त करून घेतो. ॥ ४-३८ ॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः । ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥ ४-३९ ॥

जितेंद्रिय, साधनतत्पर आणि श्रद्धाळू माणूस ज्ञान मिळवतो. आणि ज्ञान प्राप्त झाल्यावर तो तत्काळ भगवत्प्राप्तिरूप परम शांतीला प्राप्त होतो. ॥ ४-३९ ॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४-४० ॥

अविवेकी आणि श्रद्धा नसलेला संशयी मनुष्य परमार्थापासून खात्रीने भ्रष्ट होतो. संशयी माणसाला ना हा लोक, ना परलोक आणि ना सुख. ॥ ४-४० ॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् । आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय ॥ ४-४१ ॥

हे धनंजया(अर्जुना), ज्याने कर्मयोगाच्या विधीने सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण केली आहेत आणि ज्याने विवेकाने सर्व संशयांचा नाश केला आहे, अशा अंतःकरण स्वाधीन असलेल्या मनुष्याला कर्मे बंधनकारक होत नाहीत. ॥ ४-४१ ॥

## रेसिपी

### खमंग पुरणपोळी



साहित्य – 1 कप चणा डाळ, 1 कप किसलेला गूळ, एक कप मैदा, 7 ते 8 टे. स्पून तेल, 1 टी स्पून वेलची पूड, मैदा पोळी लाटण्यासाठी

कृती –1) कुकरमध्ये चणाडाळीच्या अडीचपट पाणी घालून चणाडाळ व्यवस्थित शिजवून घ्यावी. डाळ शिजली की, त्यातील पाणी निथळू द्यावे. हे पाणी वापरून कटाची आमटी तयार करता येते.2) डाळीतील पाणी निघून गेल्यावर ती डाळ एका भांड्यात घ्यावी. त्यात किसलेला गूळ घालावा. त्यानंतर मध्यम आचेवर हे मिश्रण आटवावे. ते आटवताना वरचेवर ढवळत रहा. जर तुम्ही ते मिश्रण ढवळले नाहीत, तर ते करपू शकतो. या पुरणात चमचाभर वेलची पूड घालावी.3) मिश्रण घट्ट झाले की गॅसवरून उतरवावे. यानंतर ते मिश्रण गरम असताना पुरण यंत्रातून फिरवून घ्यावे. मिश्रण थंड झाल्यावर ते नीट वाटले जात नाही.4) यानंतर मैदा घेऊन त्यात 5 ते 6 चमचे तेल आणि थोडीशी हळद मिसळावी. हे पीठ सैलसर मळून घ्यावे. भिजवलेले पीठ 2 तास ठेवून द्या.5) यानंतर पुरणाचे दीड इंचाचे गोळे बनवून घ्यावे. तर मैद्याच्या पीठाचे अर्धा ते एक इंचाचा गोळा घ्यावा. त्याची पातळसर पारी बनवून घ्यावी. त्यात पुरणाचा गोळा भरावा. सर्व बाजूंनी बंद करून घ्यावा. 7) यानंतर पोळपाटावर थोडासा मैदा टाकून हलक्या हाताने पोळी लाटून घ्या. तव्यावर खरपूस भाजून घ्यावी. साजूक तूप घालून गरम गरम सर्व्ह करावी.

# होळीसाठी झाडांची कत्तल ?

## तक्रार करा १९१६ या क्रमांकावर



होळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वृक्षतोड करू नये. अनधिकृत वृक्षतोड झाल्याचे आढळून आल्यास पोलिसांत तक्रार दाखल करण्यात येणार आहे. तसेच 'होळी'च्या कालावधीत वृक्षतोड होत असल्याचे आढळल्यास महापालिका अधिकाऱ्यांना व स्थानिक पोलिस ठाण्यास कळवावे किंवा पालिकेच्या १९१६ या 'टोल फ्री' क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन पालिकेचे उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी यांनी केले आहे. 'महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५' अंतर्गत कलम २१ अन्वये, वृक्ष प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही झाड तोडणे हा अपराध आहे. अनधिकृत वृक्षतोडीच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी संबंधित व्यक्तिला कमीत कमी १ हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद आहे. शिवाय एक आठवडा ते एक वर्षापर्यंत कैदेची शिक्षा देखील होऊ शकते.

# ब्ल्यू जेट हेल्थकेअरचा 'राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह' संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : औद्योगिक क्षेत्रात आकस्मिक दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. कोणतीही जिवित किंवा वित्तहानी होण्याआधी कटाक्षाने सुरक्षिततेचे नियम पाळणे व खबरदारी घेणं हेच गरजेचे ठरते.

ही जाणीव कामगारांमध्ये सतत होत राहावी व सुरक्षिततेच्या नियमांचं स्मरण होत राहावं या उद्देशाने ब्लू जेट हेल्थकेअर लि.च्या वतीने ५४ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे आयोजन केले गेले होते. त्याचा सांगता समारंभ कंपनीच्या प्रांगणात अनेक मान्यवर व कामगारांच्या साक्षीने पार पडला.



१९६८ साली स्थापन झालेल्या या कंपनीने आजवर सुरक्षिततेच्या बाबतीत अनेक उपाययोजना केल्या आहेत. ४ ते ११ मार्च या कालावधीत या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आलं होतं. या निमित्ताने कंपनी व्यवस्थापनानं कामगारांमध्ये सुरक्षिततेच्या बाबत जनजागृती व्हावी यासाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या .ज्यात १००० पेक्षा अधिक कामगारांनी विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवला. ज्यात सुरक्षिततेबाबत निबंध लेखन, घोषवाक्य लिहिणे, महिला रणरागिणींची फायर ड्रिल, प्रश्नमंजुषा , विविध पोस्टर्स बनवणे, विविध म्हणी, संदेश , व्हिडिओज बनवणे, प्रात्यक्षिकात्मक स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं. ज्यात कामगार महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांनी ही सहभाग घेतला.

या समारोपाच्या प्रसंगी, व्ही के सिंग (मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी ), पी बी केदार ( संचालक ब्ल्यू जेट हेल्थकेअर लि.), राजेश शिंगोटे (आर. एन. डी. प्रमुख ) विजय सादिगले ( सुरक्षा विभाग प्रमुख) डॉ. जोशी ( उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा महामंडळ, कल्याण ) आदी प्रमुख अतिथी उपस्थित होते. यावेळी, कामगारांची सुरक्षितता ही त्यांची नसून त्यांच्याशी संलग्न संपूर्ण कुटुंबाची असते याची जाणीव प्रत्येक कामगाराला कायम असावी. आणि, सुरक्षा हिच संस्कृती व्हावी असे मत मांडत डॉ. जोशी यांनी कंपनी व्यवस्थापनाने आयोजित केलेल्या या स्पर्धांचे कौतुक केले.

तर, व्हि के सिंग म्हणाले की, सुरक्षा सप्ताह हा आठवडा दिवाळी पेक्षा मोठा सण असावा . सुरक्षिततेची संस्कृती ही शाळेपासून शिकवली गेली पाहिजे. एस ओ पी , प्रशिक्षण ,सरकारी व्यवस्थापन , सुरक्षा यंत्रणा, सर्व कर्मचारी, नियंत्रक यांनी याचा अवलंब करायला हवा.जय सुरक्षेचा मंत्र ३६५ दिवस अवलंबला जायला हवा. कारण झालेली शारीरिक हानी ही कोणत्याही नुकसान भरपाई न निघून येण्यासारखी नसते.




## सरपंच अलका शेलार यांना आदर्श सरपंच पुरस्कार

कल्याण तालुक्यातील कुंदे ग्रामपंचायतीच्या सरपंच अलका शेलार यांना यावर्षीचा राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला आहे.अशी माहिती या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब पावसे पाटील, व प्रदेशाध्यक्ष रोहित संजय पवार यांनी दिली आहे.

यांना आदर्श महिला सरपंच हा पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक मान्यवरांनी व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले आहे.

# 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'चे चित्रीकरण संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : अंकुश चौधरी दिग्दर्शित 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या बहुचर्चित चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता कुरळे ब्रदर्सची धमाल पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर लवकरच पाहायला मिळणार आहे. अशोक सराफ, मकरंद अनासपुरे, भरत जाधव यांच्या जोडीला सिद्धार्थ जाधव, रिंकू राजगुरू, संकेत पाठक आणि संजय नार्वेकर यांच्याही प्रमुख भूमिका यात आहेत. चित्रपटाच्या यशस्वी समारोपानंतर कलाकार आणि निर्मात्यांनी या चित्रपटाविषयीचा आपला उत्साह व्यक्त केला. चित्रपटाचे छायाचित्रण प्रसिद्ध छायाचित्रकार संजय जाधव यांनी केले असून, हा सिनेमा प्रेक्षकांसाठी एक मोठी भेट ठरणार आहे. विशेष म्हणजे लोकशाही समूह अंतर्गत असलेले ईओडी मीडिया कंपनीचे संचालक पुष्कर यावलकर यांनी एव्हीकेसोबत हातमिळवणी करत मराठी चित्रपट निर्मितीक्षेत्रात आपले पहिले पाऊल ठेवले आहे. वयाच्या २५ व्या वर्षी निर्माता म्हणून ' पुन्हा एकदा साडे मेड तीन' मध्ये महत्त्वाची भूमिका त्यांनी निभावली आहे. अमेय विनोद खोपकर पिक्चर्स (एव्हीके),

### लोकशाही ग्रुपचे संचालक पुष्कर यावलकर यांचे निर्मितीक्षेत्रात पदार्पण

उदाहरणार्थ निर्मित,प्रस्तुत या चित्रपटाचे सुधीर कोलते,स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन निर्माते आहेत. दिग्दर्शक अंकुश चौधरी म्हणतात, "या चित्रपटाच्या सिक्वेलचा भाग होणे खूप खास आहे. नुकतेच चित्रीकरण संपले असून चित्रीकरणाचा प्रत्येक क्षण अविस्मरणीय होता आणि कलाकार व निर्मात्यांच्या मेहनतीने हा चित्रपट प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात नक्कीच यशस्वी होईल. प्रेक्षकांना ही नवी धमाल नक्कीच आवडेल."

निर्माते पुष्कर यावलकर म्हणतात, "अमेय खोपकर आणि निनाद बत्तीन यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव खूप खास होता. नुकतेच चित्रपटाचे शुटिंग संपन्न झाले असून या सगळ्या टीमसोबत काम करण्याचा अनुभव खूप कमाल होता. चित्रपट निर्मितीक्षेत्रात पाऊल ठेवणे हा माझ्यासाठी एक मोठा प्रवास होता आणि तो या टीमसोबत खूप सुखकर झाला. 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' सारख्या चित्रपटाचा भाग होणे, ही आनंदाची गोष्ट आहे.

# होळी (हुताशनी पौर्णिमा) सणामागील शास्त्र

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दुष्ट प्रवृत्ती आणि अमंगल विचार यांचा नाश करून सत् प्रवृत्तीचा मार्ग दाखवणारा उत्सव म्हणजे होळी. वृक्षरूपी समिधा अग्नीत अर्पण करून त्याद्वारे वातावरणाची शुद्धी करणे, हा उदात्त भाव होळी साजरी करण्यामागे आहे. होळी सणाचे महत्त्व, हा सण साजरा करण्याची पद्धत याविषयीची शास्त्रीय माहिती या लेखातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

होळी सणाची तिथी : देशपरत्वे फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या 5 – 6 दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो.

होळी सणाला असलेले समानार्थी शब्द : उत्तर भारतात याला होरी, दोलायात्रा, तर गोवा आणि महाराष्ट्र या राज्यांत शिमगा, होळी, हुताशनी महोत्सव अन् होलिकादहन आणि दक्षिणेत कामदहन अशा संज्ञा आहेत. बंगालमध्ये दौलायात्रा म्हणून होळीचा सण साजरा करतात. याला 'वसंतोत्सव' अथवा 'वसंतागमनोत्सव' म्हणजे वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव हे नावही देता येईल.

होळी सणाचा इतिहास : (अ.) `पूर्वी ढुंढा किंवा ढौंढा नामक राक्षसी गावात शिरून लहान मुलांना पीडा द्यायची. ती रोग निर्माण करायची. तिला गावाबाहेर हाकलून देण्याकरिता लोकांनी पुष्कळ प्रयत्न केले; पण ती जाईना. शेवटी लोकांनी बीभत्स शिव्या-शाप देऊन आणि सर्वत्र अग्नी पेटवून तिला भिववले अन् पळवून लावले. त्यामुळे ती गावाबाहेर पळून गेली.' असे भविष्योत्तरपुराणात म्हटले आहे.

आ. एकदा भगवान शंकर तपाचरणात गढले होते. ते समाधी अवस्थेत असतांना मदनाने त्यांच्या अंतःकरणात प्रवेश केला. तेव्हा 'मला कोण चंचल करत आहे', असे म्हणून शंकराने डोळे उघडले आणि मदनाला पहाताक्षणीच जाळून टाकले. दक्षिणेतील लोक कामदेव दहनाप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा करतात. या दिवशी मदनाची प्रतिकृती करून तिचे दहन करतात. या मदनाला जिंकण्याची क्षमता होळीत आहे; म्हणून होळीचा उत्सव आहे.

इ. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी झालेल्या पृथ्वीवरील प्रथम महायज्ञाची स्मृती म्हणून प्रत्येक वर्षी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी सर्व भारतात 'होली' या नावाने यज्ञ होऊ लागले.

होळीचे महत्त्व : (अ.) विकारांची होळी करून जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण : 'होळी' हा विकारांची होळी करण्याचा फाल्गुन मासातील सण आहे. 'विकारांची जळमटे जाळून टाकून नवीन उत्साहाने सत्त्वगुणाकडे जाण्यासाठी आम्ही सिद्ध आहोत', याचे जणू तो प्रतीकच आहे. राहिलेला सूक्ष्म-अहंकार हाही होळीतील अग्नीत नाहीसा होतो. तो शुद्ध सात्त्विक होतो. त्यानंतर रंगपंचमी आनंदाची उधळण करत येते. नाचत-गात एकत्र येऊन जीवनाचा आनंद लुटायचा. श्रीकृष्ण-राधा यांनी रंगपंचमीद्वारे सांगितले, 'आनंदाची उधळण करा.' असे प.पू. परशराम पांडे महाराज यांनी म्हटले आहे.

आ. होळी आपले दोष, व्यसने आणि वाईट सवयी यांना घालवण्याची सुसंधी आहे.

इ. होळी सद्गुण ग्रहण करण्याची / अंगिकारण्याची संधी आहे.

होळी उत्सव साजरा करण्याची पद्धत : देशभरात सर्वत्र साजरा केला जाणाऱ्या 'होळी' या सणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण उत्साहाने सहभागी होतात. होळीची रचना करण्याची तिला सजवण्याची पद्धतीही स्थानपरत्वे पालटत असल्याचे सध्या पाहायला मिळते. सर्वसाधारणपणे 'देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी पेटवायची असते. बहुधा ग्रामदेवतेसमोर होळी उभी केली जाते. श्री होलिकापूजनाचे स्थान शेणाने सारवून अन् रांगोळी घालून सुशोभित करतात. मधोमध एरंड, माड, पोफळी अथवा ऊस उभा करतात. त्याच्या भोवती गोवऱ्या आणि सुकी लाकडे रचतात. घरातील कर्त्या पुरुषाने शुचिर्भूत होऊन आणि देशकालाचा उच्चार करून 'सकुटुम्बस्य मम ढुण्ढाराक्षसीप्रीत्यर्थं तत्पीडापरिहारार्थं होलिकापूजनमहं करिष्ये ।' असा संकल्प करावा आणि नंतर पूजा करून नैवेद्य दाखवावा. त्यानंतर 'होलिकायै नमः ।' असे म्हणून होळी पेटवावी. होळी पेटल्यावर होळीला प्रदक्षिणा घालावी आणि पालथ्या हाताने बोंब मारावी. होळी पूर्ण जळल्यानंतर ती दूध अन् तूप शिंपडून शांत करावी. श्री होलिकादेवतेला पुरणपोळीचा नैवेद्य, तसेच नारळ अर्पण करावा. मग जमलेल्या लोकांना त्याचा प्रसाद द्यावा. नारळ, पपनस यांसारखी फळे वाटावीत. सारी रात्र नृत्यगायनात व्यतीत करावी.

# खान्देश ट्रेनचा पालघरला थांबा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

सफाळे: खान्देशातील असंख्य बांधवांच्या मागणीला यश मिळाले असून. दादर- भुसावळ स्पेशल ट्रेन नंबर (०९०५० / ०९०५२ ) दिनांक १५ मार्च २०२५ पासून रात्री- १-२९ ( AM ) वाजता पालघर येथे थांबणार व नंतर पुढे जाणार.,तसेच भुसावळ वरून येताना ही गाडी रात्री ३-१७ (AM ) वाजता पालघर येथे थांबणार आहे .

सदर गाडी दादर येथून रात्री १२-०५ वाजता सुटून, बोरिवली, विरार, पालघर, बोईसर, डहाणू रोड, वापी, बलसाड, नवसारी, भेस्तान, उधना-जंक्शन- बारडोली, व्यारा, नवापूर, नंदुरबार, दोंडाईचा, सिंदखेड नरडाणा, अमळनेर,धरणगाव, जळगाव, जंक्शन व भुसावळ या स्टेशनवर थांबणार आहे

पालघरल आणि परिसरात खानदेशातील असलेल्या व नोकरी धंदा निमित्त पालघर येथे राहणाऱ्या



जनतेला त्याचा मोठा उपयोग होणार आहे. दादर - भुसावळ या ट्रेनला पालघर येथे जाता - येताना थांबा - स्टॉप दिल्यामुळे श्री केदार काळे -शिवसेना प्रवक्ते यांनी रेल्वेमंत्री व रेल्वे बोर्डाच्या अधिकारी, जनरल मॅनेजर / डी आर एम यांचे आभार मानले आहेत.

केदार काळे यांचे रेल्वे मंत्री, रेल्वे बोर्ड अधिकारी, जनरल मॅनेजर, डीआरएम यांना सांगणे आहे. डहाणू चर्चगेट लोकल लवकरात लवकर सुरू कराव्यात, तसेच फ्लाईंग राणी व बलसाड फास्ट पॅसेंजर यांना पूर्वीप्रमाणे डबल डेकर डबे लवकरात लवकर रेल्वेने लावावेत.

# निरक्षर होणार साक्षर : शासनाचे नवे धोरण

## ठाणे जिल्हयातून २९३७५ असाक्षर व्यक्ती देणार पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : केंद्र शासन पुरस्कृत, "उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम सन २०२२-२३ ते सन २०२६-२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. देशातील 15 वर्ष आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसीत करुन देशातील 15 वर्ष आणि त्यावरील वयोगटातील असाक्षर व्यक्तींना महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये विकसीत करावयाची आहेत. या कौशल्यांमध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरुकता, बालसंगोन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण, इ. बाबींचा समावेश आहे. स्थानिक रोजगार, पुनर्कुशलता आणि उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या दृष्टीकोनातून प्रौढ नव- साक्षरांसाठी निरंतर शिक्षण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून देशातील 15 वर्ष आणि त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसीत करता येतील. त्याची अंमलबजावणी केंद्र आणि राज्य केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संबंधीत मंत्रालये / विभागांच्या सहाय्याने केली जात आहे .महाराष्ट्र राज्याने दि.१४ आक्टोबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ही योजना स्विकारली आहे. त्यानुसार २५ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी साठी राज्य स्तरीय जिल्हास्तरीय,गट स्तरीय, शाळा स्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमात उल्हास ॲपवर असाक्षरांच्या नोंदीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. नोंदणी झालेल्या असाक्षरांची पायाभूत साक्षरता व संख्यादान मूल्यमापन चाचणी दिनांक 23 मार्च 2025 रोजी ऑफलाइन पद्धतीने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये घेण्यात येणार आहे. परिक्षेसाठी ठाणे जिल्हयातून 29375 असाक्षर व्यक्ती बसणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत ज्या शाळेमधून उल्हास ॲपवर असाक्षर व्यक्तींची नोंदणी केलेली आहे अशा सर्वांनी रविवार दिनांक 23 मार्च 2025 रोजी त्या शाळेमध्ये सकाळी 10 ते सायं. 5 यावेळी जाऊन पायाभूत चाचणी परीक्षा द्यावी. तसेच सदर नोंदणीकृत असाक्षर व्यक्तींना परीक्षा केंद्रावर उपस्थित ठेवण्यासाठी शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, केंद्रप्रमुख सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावे असे आवाहन ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांच्याकडून आवाहन करण्यात येत आहे.

सदरची प्रश्नपत्रिका ही पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यांच्याशी संबंधित वाचन (50 गुण ), लेखन (50 गुण ),व संख्याज्ञान (50 गुण ) या तीन विभागांमध्ये विभागलेले असून 150 गुणांची आहे. प्रत्येक भागासाठी 17 गुण अनिवार्य आहेत व एकूण 150 गुणांपैकी 51 गुण उत्तीर्ण होण्यासाठी अनिवार्य आहेत.

परीक्षेसाठी उल्हास ॲपवरील नोंदणीकृत असाक्षर व्यक्तीच परीक्षा देण्यास पात्र आहे. सदर परीक्षा ही प्रौढांची असल्याने तसेच सामाजिक शैक्षणिक आणि इतर महत्त्वाच्या बाबीसाठी पूरक असल्याने परीक्षा केंद्रावरील वातावरण या परीक्षांसाठी आनंदाचे व उत्साहाचे ठेवण्याची जबाबदारी क्षत्रिय यंत्रणेवरील प्रत्येक घटकाचे आहे. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा विहित निकषानुसार उत्तीर्ण झाल्यानंतर नवसाक्षरांना केंद्र शासनाकडून प्रमाणपत्र / गुणपत्रक देण्यात येईल. असे शिक्षणाधिकारी ( योजना ) भावना राजनोर यांनी सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# केडीएमसी आयुक्तांची शाळांना भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड़ यांनी नुकतीच धाकटे-शहाड येथील शाळा क्र. 33 आणि नेतीवली येथील शाळा क्र.19 यांना भेट देवून, शाळेची पाहणी केली आणि शाळेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांची आपुलकीने विचारपुस केली. यावेळी शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव व शिक्षणाधिकारी विजय सरकटे, कार्यकारी अभियंता योगेंद्र



राठोड व इतर अधिकारी त्यांचे समवेत उपस्थित होते.महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार महापालिका शाळांचा संपुर्णतः कायापालट करण्याचा विडा शिक्षण विभागाने उचलला आहे. त्यानुसार आता

## शाळेतील विद्यार्थ्यांशी आपुलकीने साधला संवाद

महापालिकेच्या सर्व 61 शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव मंजुर असून, कामे प्रगतीपथावर आहेत. नविन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सर्व शाळांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे आदेश महापालिका आयुक्त यांनी शिक्षण विभागाला दिले आहेत. तसेच नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच यावर्षी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके इत्यादी शालोपयोगी साहित्य दिले जाणार आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये नवीनतम संकल्पना राबवून शाळांतील पटसंख्या वाढविण्याबाबत कसून प्रयत्न करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड़ यांनी शिक्षण विभागास दिले आहेत.

# वाचनालय(सरस्वतीचे मंदिर)

## - हेमा मुंबरकर (सह. आयुक्त केडीएमसी)

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** :सध्याच्या धकाधकीच्या जीवनात १६० वर्षे अविरत वाचन परंपरा जपण्याचे सार्वजनिक वाचनालय कल्याणचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहेच त्याच बरोबर जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही खूप मोलाचे आहे. "वाचाल तर वाचाल" या उक्तीला धरून उपस्थित सर्व महिलांनी सरस्वतीच्या या मंदिरातून विद्या संपादन करावी असे प्रोत्साहनपर उदगार प्रमुख पाहुण्या केडीएमसी सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याण, आणि कल्याण डोंबिवली महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा. भावे व्याख्यानमालेअंतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्यसाधून आयोजित "कोण म्हणतं जमणार नाही?" या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळया प्रसंगी केले.




विज्ञानात प्रगती झाली परंतु शरीराच्या गरजा बदलल्या आहेत. जंकफूड, फास्टफूड खाण्याने पोट भरतं पण शरीर उपाशी राहतं. परिणामी पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळतं. आरोग्याच्या समस्या वाढतात त्यासाठी महिलांनी आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या आहारात पौष्टिक अन्नघटकांचा समावेश केला पाहिजे असे मार्गदर्शन निसर्गोपचार तज्ञ डॉ.नीता संघवई यांनी उपस्थित महिलांना केले.

सरचिटणीस भिकू बारस्कर यांच्या संकल्पनेतून "कोण म्हणतं जमणार नाही?" या स्पर्धेत वयवर्ष १८ ते वय ७८ पर्यंतच्या वयोगटाच्या महिलांनी सहभाग घेतला होता. महिला स्पर्धकांनी नृत्य,गायन,अभिनय,उखाणे पुस्तक-लेखक नावे या माध्यमातून कलागुणांचे सादरीकरण केले. या स्पर्धेत प्रथम क्र. अनुराधा घाणेकर, द्वितीय क्र. रेश्मा कांबळे, तृतीय क्र. वैदेही पवार, उत्तेजनार्थ क्र. करुणा कल्याणकर आणि मिनल भदे यांनी पटकविला. स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ कवी संतोष जाधव, सिनेनाट्य अभिनेत्री मेधा धर्माधिकारी – गवांदे व मनिषा चव्हाण यांनी केले.

कार्यक्रम प्रसंगी वाचनालयाच्या उपाध्यक्षा आशा जोशी, चिटणीस निलिमा नरेगलकर, कार्यकारणी सदस्या अमिता कुकडे, ग्रंथसेविका, महिला स्पर्धक उपस्थित होत्या. अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहाच्या वातावरणात स्पर्धा पार पडली.

# पर्यावरणपूरक होळी साजरी करा – उप वनसंरक्षक राहुल पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : कोकणामध्ये होळी या सणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. या काळात होळीसाठी वृक्ष तोड न करता केरकचरा, सुका पाळापोचाळा जाळून होळी साजरी करावी. कोणतीही वृक्षतोड करु नये तसेच कोणत्याही प्रकारे वन्यप्राण्याची शिकार करु नये. तसेच पर्यावरणपुरक होळी साजरी करावी,असे आवाहन उपवनसंरक्षक रायगड अलिबाग राहुल पाटील यांनी आवाहन केले आहे.

वृक्षाचे घनदाट जंगल असलेल्या शहराचे स्वरुप आजघडीला काँक्रिटीकरणाचे जंगल असेच काहीसे झाले आहे. शहराच्या वाढत्या व्याप्तीमुळे सर्रासपणे वृक्षतोड केली जात असून यामुळे पर्यावरणाला मात्र मोठ्या प्रमाणावर धोका पोहोचत आहे. भारतीय वन अधिनियम, 1975 च्या तरतुदीनुसार पूर्वपरवानगिशिवाय कोणतेही झाड तोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच प्रत्यक्षात अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात कारवाईचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. अवैधरित्या वृक्षतोड केल्यास प्रत्येक गुन्ह्यासाठी 1000 ते 5000 रुपये दंड, तसेच एक आठवडा ते एक वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते, तोंडावर येऊन ठेपलेल्या होळी सणाच्या पार्श्वभूमीवर होळी जाळण्यासाठी लाकूड हवे म्हणून ठिकठिकाणी सर्रासपणे वृक्षतोड केली जात असते. तसेच प्रामुख्याने सावर जातीचे वृक्षांची अवैधपणे वृक्षतोड केली जाते. यासाठी एकीकडे वनविभाग, प्रशासन तसेच विविध विभागाद्वारे वृक्ष लागवडीसाठी प्रयत्न केले जात असताना, दुसरीकडे मात्र अनधिकृतपणे होणाऱ्या या वृक्षतोडीकडे होणारे दुर्लक्ष पर्यावरणाला अत्यंत मारक ठरणारे आहेत. तसेच अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळून अनेक प्रकारे नैसर्गिक आपत्ती येत आहे व त्यामुळे आपले सर्वांचेच नुकसान होत आहे. तसेच होळीत अनेक ठिकाणी गोवऱ्या, लाकडे जाळली जातात. या प्रकारामुळे प्रदूषणातही भर पडते. परिणामी, पर्यावरणालाही धोका पोहोचतो. धार्मिक महत्व असल्याने याबाबतही नागरिकांमध्ये प्रबोधन होण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध मंडळांनी एकत्र येऊन सार्वजनिकरित्या एकाच ठिकाणी होळी करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.



# विठ्ठलवाडीत गुढीपाडवा शोभायात्रेची जोरदार तयारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गुडीपाडवा काही दिवसांवर आल्याने सगळीकडे तयारी सुरू झाली आहे. हिंदू नववर्षच्या निमित्ताने अनेक ठिकाणी स्वागत यात्रा निघत असतात. विठ्ठलवाडी – खडेगोवली मध्ये देखील हिंदू सांस्कृतिक मंच च्या माध्यमातून प्रतिवर्षी स्वागत यात्रेचे आयोजन केले जाते. यंदा ही त्याचे आयोजन मोठ्या जल्लोष आणि थाटामाटात करण्यात येणार असून, नुकताच हिंदू सांस्कृतिक मंच ने यासाठी सार्वजनिक पूर्वतयारी सभा आयोजित केली होती. या बैठकीला विठ्ठलवाडी व खडेगोवली येतील मंडळाचे पदाधिकारी, विविध संस्था आणि मंडळाचे प्रमुख तसेच नागरिक उपस्थित होते. काही मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी यावर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करण्यासाठी तयारी चालू केली असून अनेकांनी आपले बहुमोल विचार या बैठकीमध्ये मांडले. यावर्षी गुढीपाडवा हिंदू नववर्ष शोभायात्रेत लेझीम पथक, पुणेरी ढोल, आदिवासी लोकनृत्य, राधामाधव मंदिर पथक, ब्रह्मकुमारी आश्रम सामाजिक देखावे, झारखंड मंडळाचे विविध पथक, गायत्री परिवाराची कलश यात्रा, वैदुवाडी युवकांचे साहसी खेळ प्रात्यक्षिके, बाळ गोविंदा पथकांचे मनोरे हे आकर्षण असणार आहे असे हिंदू सांस्कृतिक मंच चे अध्यक्ष मनोज माळी यांनी सांगितले .

ही पुर्व तयारी सभा नानासाहेब धर्माधिकारी उद्यानात या आयोजन करण्यात आली होते. विविध संप्रदाय आणि समाजाचे लोकं या शोभायात्रेत सहभागी होत असतात हे यांचे विशेष महत्त्व. यावेळी मंचाचे संस्थापक किशोर आल्हाट, माजी अध्यक्ष उदय म्हात्रे व शांताराम बोरसे तसेच विद्याधर आल्हाट, अरुण जुईकर, शैलेश मुसळे हे सदस्य उपस्थित होते.




# यशवंतराव चव्हाणांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावरील सभागृहात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मा.अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, थोर राष्ट्रीय नेते आणि भारताचे माजी उपपंतप्रधान.



स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला कायदा व सुव्यवस्था आणि विकासाभिमुख प्रशासनाची गरज आहे, हे ओळखणाऱ्या द्रष्ट्या व्यक्तींमध्ये यशवंतराव अग्रगण्य होते. विकासाभिमुख प्रशासनाची गरज ओळखण्यामध्ये यशवंतरावांचे जसे द्रष्टेपण होते तसेच ते महाराष्ट्र राज्यामध्ये त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यात देखील होते. प्रशासनाची एक वेगळीच छाप दाखवून, त्याचा आदर्श वस्तुपाठ यशवंतरावांनी देशपातळीवर घालून दिला होता. "सामान्य माणूस" हा त्यांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक नीतीचा केंद्रबिंदू होता. त्यांनी देशपातळीवर महाराष्ट्र राज्याचा "एक प्रागतिक राज्य" असा लौकीक निर्माण केला.याप्रसंगी उप-आयुक्त श्री. रोहिदास दोरकुळकर, श्री. बाळकृष्ण क्षीरसागर, श्री. शैलेश दोंदे, श्रीम. प्रणाली घोंगे, कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, सहा. आयुक्त शिक्षण नितीन पाटील, सहा. आयुक्त समाज कल्याण श्री. मिलिंद पळसुले व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समग्र शिक्षा योजनेतील कर्मचाऱ्यांच्या भवितव्याशी खेळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

समग्र शिक्षा योजनेतील करार कर्मचाऱ्यांच्या भवितव्याशी खेळ २० ते २५ वर्षे शासन योजनेत काम करूनही सेवेत कायम न करणे, २०१७ पासून २०२४ पर्यंत वेतनवाढ न देणे, वेतनश्रेणी ऐवजी मानधनावरच राबवून घेणे अशा अन्यायाविरोधात समग्र शिक्षा अभियानातील करार कर्मचाऱ्यांचे सुरू असलेले आमरण उपोषण पुन्हा एकदा समितीची पुनर्रचना करून संपविले आहे. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे, त्यांना माध्यमिक शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करावी तसेच सेवा नियमावलीदेखिल लागू करावी अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. करार कर्मचाऱ्यांना वेतनवाढ फरकासह देण्याबाबतचा निर्णय न्यायालयाने देऊनही शासनाकडून अद्यापही २०१७ पासूनचा फरक या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला नाही.

सहा महिन्यांनंतर खंड देऊन त्यांना सेवेत कायम केले जात नाही. त्याचबरोबर सेवाशर्ती लागू करून सेवा संरक्षणही दिले जात नाही. त्यामुळे करार पद्धतीने समग्र शिक्षा योजनेअंतर्गत कार्यरत राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधारात आहे. शासनाने समित्या स्थापन करत न बसता प्रथम या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करून घ्यावे व त्यानंतर त्यांच्यासाठी नियमावली लागू करून निश्चित वेतनश्रेणी ठरवावी व २०१७ पासूनची वेतन फरकाची थकबाकीही अदा करण्यात याबी

## जाहिर नोटीस

या नोटिसीद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की मुरबाड नगरपंचायत हद्दीतील संभाजीनगर येथिल मालमत्ता क्रमांक 705 ही मालमत्ता श्री भिला उर्फ भालचंद्र पुंजाराम पुजारी यांच्या नावे मुरबाड नगरपंचायत दप्तरी नोंद आहे. परंतु सदर मालमत्ता आता मी माझा भाऊ वसंत पुंजाराम पुजारी यांच्या नावे मुरबाड नगरपंचायत दप्तरी नोंद करावयाचे आहे.

तरी सदर मिळकतीस या व्यतिरिक्त अन्य कोणाला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी आजपासून म्हणजे नोटिस निघाल्या पासून ७ दिवसांच्या आत मा.नगरपंचायत, मुरबाड येथे हरकत घ्यावी. तद्नंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

महाराष्ट्र नगर पंचायत/नगरपरिषद औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 130 अन्वये सदर मिळकत वरिल प्रमाणे माझे व माझे वारसंचे नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपला
भिला उर्फ भालचंद्र पुंजाराम पुजारी

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

-: नोटीस :-

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | में. पाटीदार असोसिएट्स तर्फे भागीदार श्री. हंसराज पटेल व इतर | स.नं. १८६, हि.नं. १ व स.नं. १९०, हि.नं. २ मौजे-टिटवाळा | ०१ | नविन इमारत बांधकामात बाधित होत असल्याने |
| २ | के.एस. आर. शेल्टर्स, श्री. अशोक शामजी पटेल व इतर | सि.टी.स.नं. ११४५५ ते ११४६० मौजे-डोंबिवली (पू.) | ०५ | नविन इमारत बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

*जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसवि/मुका/२७३
दि. १२/०३/२०२५

सही/-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र योजना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : शून्य ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना'अंतर्गत ग्राहकांना 'रूफटॉप सोलर' पॅनेल देण्यात येतात. या योजनेला पूरक अशी राज्य सरकारची स्वतंत्र योजना लवकरच तयार करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तर तासात केले.

विजेच्या दरवाढीबाबत सदस्य मुरजी पटेल यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील वीज दर कमी करण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे पुढील पाच वर्षांसाठीचा बहुवार्षिक वीजदर याचिका (Multi-Year Tariff Petition) सादर केली आहे. यामुळे २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीत वीजदर दरवर्षी कमी होत जाणार आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, ज्याने नियामक आयोगाकडे पुढील पाच वर्षांसाठी दरवर्षी वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

मुंबईतील वीज वितरण कंपन्या – बेस्ट, टाटा पॉवर, अदाणी आणि महावितरण यांनीही वीज दरवाढीवर नियामक आयोगाकडे बहुवार्षिक याचिका सादर केली आहे. मुंबईतील मोठ्या इमारतींसाठी पारंपरिक तसेच अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून वीज उपलब्ध केली जात आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या क्षमतेपेक्षा अधिक वीज वापरण्याची क्षमता असलेल्या इमारतींसाठी नवी योजना



आणण्याचा सरकारचा विचार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, वीज दर निश्चित करण्याचे अधिकार नियामक आयोगाकडे असतात. सन २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी सरकारने प्रस्ताव सादर केला आहे. सर्व नियामक प्रक्रियांनंतर वीजदर आदेश जारी करण्यात येतील आणि त्यानुसार वीज दर आकारले जातील.

"राज्यातील नागरिकांना स्वस्त वीज मिळावी, यासाठी सरकारने निर्णायक पावले उचलली असून, 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना'ला राज्य सरकारची स्वतंत्र योजना अधिक बळकटी देईल," असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# निर्लेखित वाहनाचा लिलाव : इच्छुकांनी निविदा भरण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन येथील 1 शासकीय जुने जीप वाहन क्रमांक MH 06/ AA 0247 मोटर वाहन उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन येथे आहे त्या स्थितीत जेथे आहे तेथे व जशी आहे तशी या तत्वावर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. याकरिता इच्छुक खरेदीदारांनी निविदा सादर कराव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन महेश पाटील यांनी केले आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पेण रायगड यांच्याकडून वाहनाची अपसेट किंमत रुपये 45000/- एवढी कळविलेली आहे. लिलावाकरिता निविदा व अनामत रक्कम भरण्याचा कालावधी दि. 17 मार्च 2025 सकाळी 11.00 वाजल्यापासून ते दि. 24 मार्च 2025 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत राहील. प्राप्त निविदा दि.25 मार्च 2025 रोजी सायंकाळी 4.00 वाजता उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचे दालन, उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन येथे उघडण्यात येतील.

## संक्षिप्त

### यशवंतराव चव्हाण यांना जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अप्पर जिल्हाधिकारी(अ.का) श्री.विकास गजरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, तहसिलदार (सर्वसाधारण) श्री.सचिन चौधर, तहसिलदार (महसूल) रेवण लेंभे व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### नंदनवन सुंदर बाग स्पर्धेत जगदीश तरे द्वितीय



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरालिका व पर्यावरण दक्षता मंडळ डोंबिवली आयोजित नंदनवन सुंदर बाग स्पर्धा -२०२५ टेरेस गार्डन (किचन गार्डन)या प्रवर्गात कल्याण पूर्वेतील खडेगोळवली येथील रहिवासी जगदीश तरे यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. याबाबत केडीएमसी उपायुक्त, मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि रोपटं देवुन तरे यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उद्यान अधीक्षक अनिल तामोरे, डॉ अंजली, रुपाली शाईवाले व सर्व सदस्य उपस्थित होते.

### पडघ्यात मोफत डायलेसीस कक्षाचे उद्घाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील एका मोफत डायलेसीस कक्षाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात करण्यात आले.

शिवसेना नेते व जि. पी. पारसीक सहकारी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश पाटील यांच्यावाढदिवसानिमित्त चिंतामणी हॉस्पिटल येथे तयार करण्यात आलेल्या कै. ह. भ. प. सिताबाई नकुल पाटील मोफत डायलेसीस कक्षाचे उद्घाटन सोमवारी शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या हस्ते करून सदर कक्षाचा लोकार्पण सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला त्यामुळे डायलेसीस रुग्ण असणाऱ्या परीसरातील अनेक नागरीकांना त्याचा फायदा होणार असुन नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी मंहत शिवरुपांनंद स्वामी, सरपंच रविंद्र विशे शिवसेना उपजिल्हाप्रमुख विष्णुदादा चंदे, उपतालुकाप्रमुख योगेश (बंटी) पाटील, माजी उपसभापती गुरूनाथ जाधव, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, चिंतामण हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक मयुर दुबेले, इरफान शेख, डॉक्टर निखील घरत उपस्थित होते.

# पतपेढीने बळकावली शेतकऱ्याची जमीन



## जागृत शेतकऱ्यांनी केला विरोध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : टिटवाळा येथे एका शेतकऱ्याच्या जमिनीवर कोणतीही पूर्वसूचना किंवा चौकशी न करता ताबा घेण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. रत्नाकर धर्मा पाटील यांच्या नावावर असलेल्या सर्व्हे नंबर २२३/२ स आणि २२३/२ फ या मिळकतीवर कांचनगौरी महिला सहकारी पतपेढीच्या कर्मचाऱ्यांनी येऊन फलक लावण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाटील यांनी वेळीच याला आक्षेप घेतला आणि याबाबत स्पष्टीकरण मागितले.

शेतकऱ्याने थेट प्रश्न विचारल्यावर पतपेढीच्या कर्मचाऱ्यांकडे कोणतीही अधिकृत कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ते काही वेळाने तेथून निघून गेले. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला असून, पाटील यांनी या मानसिक त्रासाविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात पतपेढीकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे की, एका कर्जदाराने घेतलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी पतपेढीने त्याच्या मालमत्तेवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, संबंधित कर्जदाराने चुकीची जागा दाखवली आणि त्याच गैरसमजातून पतपेढीच्या वतीने पाटील यांच्या जमिनीवर ताबा घेण्याचा प्रयत्न झाला. पतपेढीने ही चूक कबूल केली असून, पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर प्रकरण मिटल्याचे सांगण्यात आले आहे.

तथापि, शेतकरी रत्नाकर पाटील यांनी आपल्या जमिनीबाबत होणाऱ्या चुकीच्या कारवाईला विरोध करताना हा विषय फक्त गैरसमजाचा नसून त्यांच्या प्रतिमेवर व मानसिक आरोग्यावर परिणाम करणारा प्रकार असल्याचे सांगितले आहे. त्यांनी आपल्या वकिलामार्फत पतपेढीला नोटीस बजावली असून, या घटनेमुळे समाजात त्यांची झालेली बदनामी आणि मानसिक त्रास यासाठी पुढील कायदेशीर पाऊले उचलण्याचा विचार करत आहेत.

# कल्याणमधील रिव्हरडेल इमारतीला आग



## दीड तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण झुलेलाल चौकातील रिव्हरडेल इमारतीच्या 13 आणि 14 व्या मजल्यावरील फ्लॅटला आग लागल्याची घटना समोर आली आहे. घटनास्थळी अग्नीशमन दलाचे आधिकारी दाखल झाले असून त्यांनी दीड तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवलं आहे. आगीने रौद्ररूप धारण केलं कल्याण झुलेलाल चौकातील रिव्हरडेल इमारतीच्या 14 व्या मजल्यावरील फ्लॅटला आग लागल्याची घटना घडली आहे. काही क्षणात आगीने रौद्ररूप धारण केलं. आगीमुळे इमारतीमधील राहिवाशांमध्ये भीतीच वातावरण निर्माण झाले होते. आग मोठी असल्यामुळे रहिवाशांनी इमारतीखाली धाव घेतली.

दीड तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण अग्निशमन दलाच्या सहा गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. त्यांनी दीड तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवलं आहे. सध्या कुलिंगचे काम सुरू आहे, अशी माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहेत. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती या इमारतीत शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती नागरिकांनी दिली असं अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. आगीचे कारण आम्ही शोधत आहोत, असं त्यांनी सांगितलं. सुदैवाने अद्याप कोणतीही जीवितहानी नाही या घटनेत झालेली नाही, मात्र फ्लॅटचे नुकसान झाले आहे, असं त्यांनी सांगितलं.

# ग्रामस्थांचे हेटवणे धरणावर आंदोलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : स्वातंत्र्याची ७५ वर्ष उलटून गेली तरी पेण तालुक्यातील खारेपाट भागातील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नाही. अनेक आंदोलने, उपोषणे झाली तरीही ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने अखेर आज (११मार्च) ग्रामस्थांनी थेट हेटवणे धरणावर जाऊन कालव्यामधील पाण्यात उतरून जल आंदोलन केले. या धरणाच्या पाण्यावर सर्वप्रथम आमचा हक्क असून तो हक्क मिळवल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही असे जाहीर केले.

नवी मुंबईला हेटवणे धरणाचे जाणारे पाणी रद्द करावे, जल बोगद्याचा मंजुरी प्रस्ताव रद्द करण्यात यावा, लवकरात लवकर कार्यारंभ आदेश देण्यात यावेत आदी मागण्या घेऊन या महिला भगिनींनी हंडा घेऊन आज हेटवणे धरणावर जल आंदोलन केले. यावेळी खारेपाट विभागातील आंदोलनकर्ते खारेपाट विकास संघटना अध्यक्ष प्रकाश माळी नंदा म्हात्रे संतोष ठाकूर, हेमंत पाटील, सी.आर.म्हात्रे, राजन झेमसे, महेंद्र ठाकूर राजेंद्र म्हात्रे, बळीराम भोईर जितू ठाकूर अभिमान्यू म्हात्रे प्रसाद पाटील अजित पाटील आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

> सदर प्रकल्पाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. शासन स्तरावर प्रस्ताव देखील पाठवला आहे. कामाची मंजुरी मिळाल्यानंतर कालव्याचे काम सुरू होईल.
> – आर एस कापाले, सहाय्यक अभियंता श्रेणी १

पेणच्या खारेपाट भागासाठी 767 कोटी रुपये शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत, मात्र आज चार महिने होऊन देखील कार्यारंभ आदेश देण्यात आले नाहीत. मार्च अखेर नंतर हा कार्यारंभ आदेश आला तर पावसाळा येईपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही, त्यामुळे यावर्षी सुद्धा आमच्या खारेपाट भागाला पिण्याचे पाणी मिळणे कठीण आहे आणि याला सर्वस्वी जबाबदार येथील लोकप्रतिनिधी आहेत याची आम्हाला लाज वाटते. मात्र आज आम्ही प्रशासनाला नोटीस देऊन या हेटवणे धरणावर जल आंदोलन केले असले तरी यापुढे कोणतीही पूर्वसूचना न देता आम्ही येथे येऊन जलसमाधी घेऊ अशा प्रकारचे सडेतोड उत्तर खारेपाट विभागातील आंदोलनकर्ते महिला व ग्रामस्थांनी दिले.

> शेती सिंचन प्रकल्पाबाबत जो सेवा हमी कायदा आहे त्यात ज्या अधिकाऱ्यांनी दप्तर दिरंगाई केली आहे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी आणि जोपर्यंत आम्हाला पिण्याचे आणि सिंचनाचे पाणी मिळत नाही तोपर्यंत आमचे हे आंदोलन सुरूच राहील.
> – प्रकाश माळी,अध्यक्ष – खारेपाट विभाग संकल्प विकास संघटना

# मुक्या प्राण्यांचा तारणहार प्रशांत मानकर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सफाळे ; सफाळे परीसर नव्हेतर पालघर जिल्हा वेळ काळ दिवस रात्र न पहाता कोणतीही आपत्ती कालीन परिस्थितीत मग ती मनुष्य निर्मित / नैसर्गिक / अपघात, किंवा आगजन्य परीस्थिती कि पावसामुळे उत्पन्न झालेली पुरजन्य परिस्थिती. यावेळी मदत कार्यासाठी सर्वत्र धावणारे प्रशांत मानकर आणि सर्पमित्र / प्राणी मित्र गृप सफाळे, ता. जि. पालघर. त्यांच्या या कार्याला नेहमीच अदृष्य राहून सतत पाठिंबा देणारे, आणि सर्वांनीच आपले मानणारा सामाजिक कार्यकर्ता. यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे.

प्रशांत मानकर यांना भरदुपारी फोन आला व सांगितले रामबाग-मांडे रस्त्यावर एक मुका प्राणी - कुत्र्याच्या गळ्यात मोटारसायकलची तुटलेली ब्रेक वायर अडलेली असून, खूप प्रयत्न करूनही तो मुका प्राणी हातात येत नाही आहे.

परिस्थितीचे गांभीर्य बघता प्रशांत मानकर - यांनी कोणतीही विचार न करता,भर उन्हात आपल्या सर्पमित्र टिमसह घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे निरीक्षण करून. गांभीर्य ओळखून, मच्छिमार बांधव मासे पकडण्यासाठी उघड्यावर लावतात त्या प्रकारच्या नायलॉनच्या जाळीचा वापर करून, घाबरलेल्या कुत्र्याला जाळीत घेऊन. त्यांच्या गळयात अडकलेल्या ब्रेक वायर हाताने पकडून, आपल्या जवळ असलेल्या वायर कटरने अलगदपणे वायर कट करून मुक्या प्राण्यांची, त्याला होणाऱ्या त्रासातून सुटका केली. एवढेच नव्हेतर त्यांच्या गळयावर झालेल्या जखमेवर औषधोपचार करून सोडले आहे.

मुक्या प्राण्यांची त्याला होणाऱ्या त्रासापासून सुटका केल्याबद्दल परिसरात नागरिक सर्पमित्रांचे कौतुक करीत आहेत.

## 'पंचायत महिला शक्ती अभियान' अंतर्गत

# गाव कारभारणी मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ११ मार्च २०२५ रोजी सुभाष पवार जनसंपर्क कार्यालय, शिवळे येथे जागतिक महिला दिनानिमित्त 'पंचायत महिला शक्ती अभियान' अंतर्गत जनसेवा प्रतिष्ठान, मुरबाड व सावित्री अकादमी, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने "गाव कारभारणी मेळावा" तालुक्यातील महिला सरपंच व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या संपन्न झाला. या मेळाव्याचे उद्घाटन भीम रासकर , संस्थापक, महिला राजसत्ता आंदोलन व संचालक, सावित्री अकादमी आणि रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट यांनी केले, त्यांच्या भाषणातून पंचायत राज व्यवस्था, ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार महिलांना मिळालेले दागिने मुख्यतः स्वतंत्र वित्त









आयोग, निवडणूक आयोग, महिला आरक्षण, विकेंद्रीकरण व ग्रामसभा याबाबत विस्तृत सोप्या शब्दात मांडणी केली तसेच महिलांच्या राजकिय प्रगतीच्या आड येणाऱ्या प्रमुख समस्यांचा पाढा वाचला प्रामुख्याने धर्मसत्ता, पितृसत्ताक व्यवस्था, जात व्यवस्था, अर्थ सत्ता व वर्ग सत्ता यांवर मात करण्यासाठी सर्व गाव कारभारणी संघटित होणे गरजेचे आहे व सावित्रीचा कट्टा माध्यामातून राजकिय चर्चा केली पाहिजे जर राजकारण सर्व गोष्टी ठरवत आहे तर तुमच्या स्तरावरील राजकारण काय असावे हे तुम्ही ठरवा अशी सुचना केली. या गाव कारभारणी मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शन करण्यासाठी किसळ ग्रामपंचायत सरपंच डॉ. कविता वरे- भालके आवर्जून उपस्थित होत्या, त्यांनी त्यांच्या जोश पूर्ण भाषणात सरपंचांना प्राप्त झालेले अधिकार वापरले पाहिजेत हे विषद केले तसेच शाश्वत विकासाच्या संकल्पना राबविण्यासाठी आवश्यक पाउले उचलण्यास सुरुवात करावी मुख्यतः महिला व बाल स्नेही ग्रामपंचायत, पर्यावरण स्नेही व आरोग्य दायि गाव बनवण्यासाठी मार्गदर्शन केले, प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभे अगोदर ५ सभा घेतल्या गेल्या पाहिजेत यामध्ये बाल सभा, महिला सभा, वार्ड सभा, वंचित घटकांची सभा व पेसा सभा झाल्या पाहिजेत व त्यांचे प्रश्न सोडविले गेले पाहिजेत हे मांडले. या गाव कारभारणी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद ठाणे माजी उपाध्यक्ष तथा जनसेवा प्रतिष्ठान अध्यक्ष सुभाष पवार हे होते त्यांच्या अध्यक्षीय भाषणात महिला शक्तीचे महत्त्व विषद केले व आजच्या मेळाव्यात मांडण्यात आलेल्या मुद्दयांना अनुमोदन दिले आणि संरचनात्मक काम करण्याची सुचना केली तसेच दोन्ही संस्था तुम्हाला सर्वतोपरी मदत करणार असे आश्वासन दिले. या मेळाव्यात अरुणा खाकर, प्राजक्ता भावार्थे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच जनसेवा प्रतिष्ठान सचिव धनाजी दळवी यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. महिला हक्कांच्या व "व्होट हमारा राज हमारा" घोषणांच्या निनादात मेळाव्याची सांगता झाली.

# आडीवलीतील रस्ता बनवा : आमरण उपोषणाचा इशारा

## आई एकविरा महिला मंडळ आक्रमक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वेतील आडीवली परिसरातील रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून रखडला असून याबाबत वारंवार पाठपुरावा करून देखील महानगरपालिका प्रशासन याकडे लक्ष देत नसल्याने आई एकववीरा महिला मंडळ आक्रमक झाले असून येत्या 14



एप्रिल पर्यंत रस्ता न बनविल्यास 15 एप्रिल पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा आई एकविरा महिला मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सोनी क्षीरसागर यांनी दिला आहे. गेल्या १० वर्षापासुन संपूर्ण अडिवली परिसर हा महानगर पालिकेत असून गेल्या ५ वर्षा पासून आई एकविरा महिला मंडळाच्या वतीने पत्राद्वारे ऑस्टिन नगर, अजंनाबाई गॉर्डन येथील रस्त्याची अवस्था वारंवार आपल्या केडीएमसीच्या अधिकारी यांच्या निर्दशनास आणून दिले असून आजपर्यंत कोणत्याही प्रकारची रस्त्यांची सुधारणार करण्यात आली नाही.या मंडळाच्या वतीने व नागरिकांच्या वतीने गेल्या २ वर्षापूर्वी दिनांक २२ फेब्रुवारी २०२३ रोजी महानगरपालिकेवर निषेध आंदोलन करण्यात आले होते, त्यावेळी शहर अभियंता यांच्या कार्यालयात लिखित स्वरूपात ४ महिन्यात रस्ता बनवून देणार असे पत्र लिहून देण्यात आले होते. मात्र दोन वर्ष उलटून देखील हा रस्ता बनविण्यात आला नाही. त्यामुळे येत्या एप्रिल महिन्यांच्या पहिल्या आठवडयात रस्त्याच्या कामाची सुरूवात करण्यात आली नाही तर, मंडळाच्या व नागरिकांच्या वतीने १५ एप्रिल रोजी केडीएमसीच्या मुख्य कार्यालया बाहेर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा क्षीरसागर यांनी दिला आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024